| CNR No.MHND270004582021 | संक्षिप्त खटला क्र.१८४/२०२१ |
|---|---|
| | सरकार वि. रमेश |
| | भा.दं.वि.च्या कलम २७९, ३३७, ३३८ अन्वये |
| | निशाणी क्र.११ खाली |

# न्यायनिर्णय

## ( दिनांक २८.०७.२०२६ रोजी घोषीत केला )

१. सहाय्यक सरकारी विधिज्ञ श्री. एस. बी. पवार व आरोपीचे विधिज्ञ श्री. ए. व्ही. महाजन यांचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर माझ्यासमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत झाले. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील कारणांसह नोंदवित आहे.

२. आरोपी भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ अन्वये भारतीय दंड विधानाचे (यानंतर थोडक्यात ''भा.दं.वि'' असे संबोधण्यात येईल) प्रमाणेच्या न्यायचौकशीला सामोरे जात आहेत.

**खटल्याची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणेः**

३. दि. २७.०३.२०२१ रोजी सायंकाळी १८.०० वा.चे सुमारास पाथरड रेल्वे स्टेशन शिवारामध्ये पाथरड ते ब्राम्हणवाडा जाणारे महादेव मंदिराजवळ वळनावर तुमचे वाहन क्र. एम.एच.२६.एच–८३०१ ने समोरुन येणारी मोटारसायकल क्र. एम.एच.३८ एस–४९८७ ला धडक देऊन मोटारसायकलवर असलेले फिर्यादी व त्यांचे पाठीमागे बसलेली फिर्यादीची आजी यांचे दुखापतीस कारणीभुत ठरला.

४. वरील आशयाच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.३३/२०२१ प्रमाणे गुन्हयाची नोंद झाली व तपास भाऊराव पावडे तपास अधिकारी यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपींविरुध्द पुरावे मिळून आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपींविरुध्द निशाणी क्र.११ प्रमाणे दोषारोप ठेवले. आरोपींनी दोषारोप नाकारुन संपरिक्षा अव्हाणीत केली.

६. संपरीक्षे दरम्यान अभियोगपक्षाने केवळ तीन साक्षीदारांना तपासले आहे. आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा मिळून आल्यामुळे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे आरोपींची निवेदने नोंदविण्यात आले नाही.

७. सरकारी वकील व आरोपींचे वकील यांनी युक्तीवाद केला. दोन्ही पक्षांचा युक्तीवादावरुन व अभिलेखावरुन खालील प्रमाणे मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होते त्यांना पुढील कारण मिमांसेद्वारे मी उत्तरीत केले आहे.

८. सहाय्यक सरकारी विधिज्ञ श्री एस.बी. पवार व आरोपीचे विधिज्ञ श्री. खानसोळे यांचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर माझ्यासमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत झाले. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील कारणांसह नोंदवित आहे.

| **अक्र.** | **मुद्दे** | **मत** |
|---|---|---|
| १ | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दि. २७.०३.२०२१ रोजी सायंकाळी १८.०० वा.चे सुमारास पाथरड रेल्वे स्टेशन शिवारामध्ये पाथरड ते ब्राम्हणवाडा जाणारे महादेव मंदिराजवळ वळनावर तुमचे वाहन क्र. एम.एच.२६.एच–८३०१ हे भरधाववेगाने व निष्काळजीपणाने मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशी चालविली त्याद्वारे कलम २७९ भा.द.वि. अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा दाखल केला ? | **नाही** |
| २ | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातीलवाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीसगंभीर व किरकोळ दुखापत पोहचवली त्याद्वारे कलम ३३७ भा.द.वि. अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा दाखल केला ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| ३ | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातीलवाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीसगंभीर व किरकोळ दुखापत पोहचवली त्याद्वारे कलम ३३८ भा.द.वि. अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा दाखल केला ? | **नाही** |
| ४ | अंतिम आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

९. आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली आहे. भास्कर साईनाथ पुयड (सा.क्र.१) या एका साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून जबाब नि.क्र.११ अभियोगपक्षाच्या वतीने शाबीत करण्यात आले.

**मुद्दा क्र. १ व ३ करीता:**

१०. आरोपीविरुध्दचे सर्व आरोप एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे निष्कर्ष मी एकत्रित नोंदवित आहे. आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षाने असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक क्र. एम.एच.२६.एच–८३०१ हे भरधाव वेगात व निष्काळजीपणाने मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे चालविले व फिर्यादी व त्याचे आजीस गंभीर व साधी दुखापत पोहचवली.

११. **भास्कर साईनाथ पुयड (सा.क्र.१)** यांनी त्यांच्या बयाणात असे सांगितले आहे की, सदरची घटना चार–पाच वर्षापुर्वी महादेव मंदीर पाथरड येथे घडली होती. त्यांना पाठीमागुन गाडीने धडक दिली होती, ती गाडी कोणती होती हे त्यांनी सांगितले नाही. व त्यांनी फिर्याद दिली काही हे त्यांना आठवत नाही. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदार हा सरकार पक्षास सहकार्य करित नसल्यामुळे उलट तपासणी करण्याची परवानगी मागितली असता परवानगी देण्यात आली.

त्यांनी त्यांचे उलटतपासणीमध्ये असे सांगितले की, त्यांना अधोरेखित भाग–अ वाचुन दाखवला असता तो त्यांनी नाकारला आणि त्यांचा व आरोपीमधील वाद कोर्टाचे बाहेर मिटलेला आहे असे त्यांनी सांगितले आहे त्यामुळे फिर्याद सिद्ध होत नाही व आरोपीने सदरचा गुन्हा दाखल केला आहे असे सिद्ध होत नाही.

**१२.** खुद्द फिर्यादी यांनी अभियोग पक्षाला समर्थनिय पुरावा सिद्ध केलेला नाही त्यामुळे उलट तपासणीमध्ये मध्ये त्याची साक्ष विश्वासपूर्ण नाही या बाबत कोणतेही तथ्य समोर आलेले नाही. अभिलेखावर उपलब्ध पुरावा हा आरोपांच्या शाबीती करिता पुरेसा नाही. सबब आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.३ करीता:–**

**१३.** मुद्दा क्र.१ व २ च्या नकारार्थी निष्कर्षावरून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१** आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ अन्वये या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२** आरोपीचे जामिन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे मा. वरीष्ठ न्यायालयात हजर राहण्यासाठी रक्कम रु.१०,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

सही/–

दिनांक: २८/०७/२०२६

**( श्रीमती शीतल पी. कौल )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, मुदखेड,
**जि.नांदेड.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | S.D.Pawar |
| Court Name | : | J.M.F.C. Mudkhed |
| Date | : | 28/07/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 28/07/2026 |
| Judgment Uploaded on | : | 28/07/2026 |